**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२, दिनांक २३ मे २००३

**आदेश**

**महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१.**

क्रमांक मत्स्यवि-१००२/(१०५)/पदुम-१४,-- महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (सन १९८१ चा महा. ५४) च्या कलम ४ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन उक्त कलम ४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ड) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबी विचारात घेऊन व उक्त अधिनियमाच्या कलम ३ अन्वये रचना करण्यात आलेल्या सल्लागार समितीशी विचारविनिमय केल्यानंतर शासन याद्वारे भाभा परमाणू अनुसंधान केंद्राच्या सागरी सीमांपासून पाचशे मीटरचे क्षेत्र हे ‘‘मासेमारीस निषिध्द क्षेत्र’’ म्हणून घोषित करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

जे. पी. डांगे
शासनाचे प्रधान सचिव,